**वादी तर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.**

**१३**. मी पुर्वीपासून शेतीकाम करतो. मी कधीही मुंबई येथे नोकरी केलेली नाही. माझे दुसरी पर्यंतचे शिक्षण झाले असून मला थोडेफार लिहिता– वाचता येते. मला तीन भाऊ असून वेगवेगळे राहतो. माझी तीन ठिकाणी जमीन आहे. त्यांचे अनुक्रमे ९०, ९२ व १२२ असे गट क्रमांक आहेत. गट क्र.९० चे क्षेत्र ३ गुंठे, गट क्र.९२ चे ५ गुंठे आणि गट क्र. १२२ चे तिघांमध्ये अंदाजे ५६ गुंठे आहे. गट क्र.९२ मध्ये आमचे तीन हिस्से असून आम्ही त्यामध्ये घरे बांधलेली आहेत.

**१४**. मला दोन मुले आहेत. माझा एक मुलगा मुंबई येथे नोकरी करत असून दुसरा गावी शेती करतो. संतू केसरकर हा माझा चुलत चुलत भाऊ असून तो फार वर्षांपूर्वी मयत झालेला आहे. मला त्याच्या मृत्यूची तारीख सांगता येणार नाही. त्याला पत्नी व दोन मुली असे वारस आहेत. मला वादीने हा दावा कशासाठी केला आहे आणि कोण प्रतिवादी आहेत याची माहिती नाही. मला वादीने या दाव्यात किती मिळकती समाविष्ट केल्या आहेत याची माहिती नाही. मी माझे शपथपत्र करण्यासाठी स्वतःहून वकिलांकडे गेलेलो नाही. मी वकिलांनी तयार करुन आणलेल्या शपथपत्रा वरती स्वाक्षरी करुन न्यायालयात सादर केले आहे.

**१५.** मी संतू केसरकर च्या जमिनीचे ७/१२ उतारे पाहिलेले नाहीत. संतूच्या मृत्यूपूर्वी एका व मृत्यूनंतर दुस–या मुलीचे लग्न झाले आहे. संतूची मुलगी सोनाबाई हिला तावरेवाडी, ता. गडहिंग्लज येथे दिले होते. मी त्या लग्नाला हजर होतो. त्यावेळी संतू हयात होता, त्याने चांगले स्थळ पाहून सोनाबाईचे लग्न करुन दिले होते. मला सोनाबाईच्या पतीची तावरेवाडी येथे घर व शेतमिळकत असल्याबाबत माहिती नाही. सोनाबाईचा पती मयत असून तिला संतोष नावाचा एक मुलगा आहे. मला सोनाबाईच्या पतीची तावरेवाडी येथील मिळकत कोण कसतात व किती उत्पन्न मिळते याबाबत माहिती नाही. मला ती मिळकत आहे किंवा तिची विक्री झाली आहे याची माहिती नाही.

**१६**. मी वादीला ओळखतो. ती तिची आई असेपर्यंत किणे गावी येत होती. ती सध्या किणे गावी येत नाही. वादी ही येसूबाईच्या भाच्याला लग्नात दिलेली आहे. हे म्हणणे खरे

आहे की, येसूबाईला मुलगा नसल्यामुळे वादीचे नात्यात लग्न लावून दिलेले आहे. मला सोनाबाई तिच्या लग्नानंतर नांदायला गेल्याची माहिती नाही.

**१७**. मला १९८८ साली वाटणीपत्र करुन वादीला सोने दिल्याची माहिती आहे. १९८८ साली निर्मला साधारणपणे १० ते १२ वर्षांची होती. मला त्यावेळी येसूबाई व सोनाबाईचे वय काय होते याबाबत सांगता येणार नाही. ती बैठक गावाच्या चावडीमध्ये झाली होती. मी तेथे गेलो होतो. त्यावेळी मसणू सुतार गावचे सरपंच होते. मला त्या बैठकीला कोणीही बोलावले नव्हते. त्यावेळी मी चावडीबाहेर बसलेलो होतो. बैठक चालू झाल्यावर मी स्वतःहून चावडीत जाऊन बसलो होतो. येसूबाईचे घर आमच्या घरापासून तीन घरे अंतरावरती होते. चावडी माझ्या घरासमोर होती. त्यावेळी आमच्या भावंडांमध्ये वाटण्या झाल्या नव्हत्या. ते घर आज रोजी माझ्या धाकटया भावाच्या ताब्यात आहे. मी ते घर ७ ते ८ वर्षांपूर्वी भावाला देऊन दुस–या जागी राहत आहे. माझे नवे घर वादीच्या घरापासून लांब अंतरावरती आहे.

**१८**. मला माझ्या जुन्या व नव्या घराचे मिळकत क्रमांक आठवत नाहीत. मी देवदर्शना साठी गावातल्या घराकडे जात असतो. येसूबाईचे घर आज रोजी पडलेले आहे. मला प्रतिवादी विरोधात न्यायालयाने मनाई आदेश दिल्याची माहिती नाही. मला २०११ पूर्वी वादी, संतूबाई आणि सोनाबाई यांच्यात शेतमिळकतीचे वाटप झाल्याची माहिती नाही. मला वादीने तिचा हक्क सोडून दिल्याची माहिती नाही.

**१९.** मी संतोषने बोलावल्यामुळे साक्ष देण्यासाठी आलो आहे. मला त्याने वादीने तिचा हक्क लेखी स्वरुपात सोडून दिल्याचे सांगितले नाही. मला महिलांना वारसाने हक्क मिळतो याची माहिती नाही. आम्ही आमच्या बहिणीचे नोंदणीकृत हक्कसोडपत्र केले आहे. मला वादी व प्रतिवादीच्या कुटुंबात नोंदणीकृत हक्कसोडपत्र झाल्याची माहिती नाही. मी वादीला दिलेले सोने पाहिले नव्हते. मी त्याबाबतचा लेखी कागद पाहिला नव्हता. मी त्या प्रकरणात पंचाचे काम केले नाही. त्या बैठकीच्या वेळी निर्मलाचे लग्न झालेले होते. मला त्या बैठकीसाठी निर्मला कधी माहेरी आली होती याची माहिती नाही. बैठक झाल्यानंतर निर्मला निघून गेली होती.

२०. मला त्यावेळी निर्मला सोबत कोण आले होते याची माहिती नाही. त्या बैठकीमध्ये निर्मला आतल्या बाजूला बसली होती. ती बैठक ११.०० वाजेच्या दरम्यान चालू झाली होती. मी निर्मला येण्यापूर्वी चावडीत जाऊन बसलो होतो. त्यावेळी निर्मला येण्यापूर्वी चावडीमध्ये मसणू सुतार, भागोजी पताडे, परसू सलामवाडे आणि मोतबा केसरकर बसलेले होते. त्यावेळी येसूबाई व सोनाबाईला बोलवायला पाठवले होते.

२१. संतोष डेअरी व शेती व्यवसाय करतो. आम्ही गरज भासल्यास एकमेकांना शेती कामात मदत करतो. मी संतोषच्या सांगण्याप्रमाणे आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याने मला कसा जबाब द्यायचा याबाबत सांगितले आहे. मी वादीच्या पतीला ओळखतो. निर्मला व तिचा पती शिवाजी येसूबाईच्या हयाती पर्यंत तिला भेटण्यासाठी येत–जात होते. माझे व संतोषचे भाऊबंद असल्यामुळे चांगले संबंध आहेत. मी खरी बाजू मांडण्यासाठी आलो आहे. मी संतोषच्या सांगण्यावरुन साक्ष द्यायला आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे संतोष सोबत चांगले संबंध असल्यामुळे मी आज खोटी साक्ष देत आहे.

२२. येसूबाई वृध्दापकालाने मयत झाली आहे. तिची आमच्या भाऊबंदांमध्ये जास्त शेतीवाडी असल्यामुळे ती खाऊन–पिऊन सुखी होती. त्यामधून भात व ऊसाचे निघणारे उत्पन्न येसूबाईकडे तिच्या हयाती पर्यंत येत होते. येसूबाईला मोठया दवाखान्यात उपचार घ्यावा लागेल असा आजार नव्हता. मला येसूबाईला कोणत्या आजारासाठी कोल्हापूरच्या दवाखान्यात नेले होते याची माहिती नाही. त्यावेळी तिला पाच दिवस दवाखान्यात ठेवले होते. त्यानंतर ती दोन ते तीन वर्षे जगली होती. मी त्यासाठी किती खर्च आला होता याबाबत संतोषला विचारले नाही. मी त्याची कागदपत्रे पाहिली नाही.

२३. मी संतोषने खरेदी केलेल्या दस्तावेळी हजर नव्हतो. मला संतोषने येसूबाई पैसे दिले– घेतल्याची माहिती नाही. खरेदीपत्राच्या वेळी येसूबाईची तब्येत बोजड होती, ती चालू– फिरु शकत होती. मी त्यापूर्वी येसूबाईला भेटलो नव्हतो. तीने मिळकत विक्री करत असल्याबाबत मला सांगितले नव्हते. येसूबाई मला कधीही तिला पैशांची अडचण आहे असे म्हणाली नव्हती. माझे येसूबाई सोबत चांगले संबंध होते. ती काही कामांसाठी

माझी मदत घ्यायची.

**२४.** मला गट क्र.९५ च्या बाजूला असलेल्या माझ्या मिळकतीचा क्रमांक सांगता येणार नाही. तेथील माझ्या मिळकतीच्या पुर्वेला राघोबा केसरकर, पश्चिमेला रेंबळे, दक्षिणेला पांडुरंग केसरकर आणि उत्तरेला परसू सलामवाडे याची मिळकत आहे. गट क्र.२४७ च्या पुर्वेला माझी जमीन आहे. मला तिचा गट क्रमांक सांगता येणार नाही. त्या जमिनीच्या पुर्वेला राघोबा केसरकर, पश्चिमेला पांडू रेंबळे, दक्षिणेला पांडु केसरकर आणि उत्तरेला परसू सलामवाडे यांची मिळकत आहे.

**२५.** हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.९५ व २४७ ला लागून माझी जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा मिळकतीच्या व्यवहारा बाबत आणि वहिवाटी बाबत कोणतीही माहिती नसताना मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेल्या १९८८ सालच्या बैठकीला कधीही हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०८.०६.२०२६. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.